दिनांक : १०.०४.२०२४

लार्क ( संमिश्र अपंगत्व )
वार्षिक अहवाल २०२३ - २०२४

मुख्याध्यापिका व ८ शिक्षक पूर्ण वेळ १ ऑनररी शिक्षक व ३ मावश्या, २ ताई मदतनीस म्हणून कार्यरत आहेत. शाळेत एकूण ५० विद्यार्थी आहेत.

शाळेत एकूण विद्यार्थ्यांचे त्यांच्या शारीरीक, बौध्दिक व मानसिक क्षमताचा विचार करून ५ वर्गाची आखणी केली आहे. त्या व्यतिरिक्त खेळ, क्राप्ट, शारीरक व्यायाम, योगा, गायन या ॲाटिव्हिटी विद्यार्थ्यांच्या गरजेप्रमाणे चालू आहे. विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे एप्रिलमध्ये अभ्यासक्रमाची आखणी केली जाते. विद्यार्थ्यांना वहया, शैक्षणिक साहित्य पुरविले जाते आणि यावर्षी अभ्यासक्रमाचे पुस्तक छापून घेण्यात आले व विद्यार्थ्यांना ते देण्यात आले आहेत.

दरवर्षी प्रमाणे चालणारे सर्व उपक्रम नियमीत सुरू होते.

नविन प्रवेश

- यावर्षी एकूण १५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

सातत्याने चालणारे उपक्रम

- दि. ०१ जून रोजी संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी सर्व प्रिझम सटाफ उपस्थित होता.
- दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त 'मेरी मिटी मेरा देश' अंतर्गत मातीच्या पणत्या विद्यार्थ्यांकडून बनवून घेण्यात आल्या होत्या.
- लिप्पन आर्ट ही कलाकृती दि. २१ ते ३०.०८.२०२३ पर्यत विद्यार्थ्यांकडून पूर्ण करून घेण्यात आली.
- दि. ०५.०९.२०२३ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला. एम.ओ.व्ही.एस शाळेतील विद्यार्थ्यांनी सर्व शाळेचे कामकाज पाहिले. तसेच शिक्षक विद्यार्थ्यांनी सर्व शिक्षक व मावशी काकांच्या स्पर्धा व ॲक्टिव्हिटी घेतल्या. लार्क शाळेतील विद्यार्थ्यांनी बनविलेले बुकमार्क लार्क, एम.ओ.व्ही.एस शाळेतील शिक्षकांना, ऑफिस कर्मचा-यांना व सेवक कर्मचा-यांना भेट म्हणून देण्यात आले. प्रिझम फौंडेशन कडून सर्व शिक्षकांना सुंदर दिवा भेटवस्तू म्हणून देण्यात आला.
- दि. २०.०९.२०२३ रोजी संस्थेत 'गणेश स्थापना' करण्यात आली. यावर्षी 'जंगल' याविषयावर हॉल सजावट करण्यात आली होती. यासाठी विद्यार्थ्यांनी चित्रे व चार्ट तयार केले होते.
- दि. ०८.०९.२०२३ रोजी कै. पद्मजा गोडबोले आंतरशालेय कविता पाठांतर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेच्या प्रमुख पाहुण्या व परिक्षक म्हणून मा. आरती भट या उपस्थित होत्या.
  या स्पर्धेत बाहेरील ७ शाळा मिळून एकूण २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे नियोजन लार्क व एम.ओ.व्ही.एस शाळेतील शिक्षकांनी केले होते.

- दि. १६.१०.२०२३ रोजी वाचन व लेखन दिन साजरा करण्यात आला.
- दि. २२.१२.२०२३ रोजी आयोजित शेकोटी हा उपक्रम राबविण्यात आला होता. पालकांचा खूपच कमी प्रतिसाद मिळाल्याने संध्याकाळी ७.३० वा. पर्यंत थांबविण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी वेगवेगळया खेळांची मजा घेतली. विद्यार्थ्यांना पुरी, केक व बाकरवडी हा खाऊ म्हणून देण्यात आला.
- शैक्षणिक गट क व प्राथमिक गट ब मधील विद्यार्थ्यांची सहल राजा मंत्री उद्यान येथे नेण्यात आली होती. विद्यार्थ्यांना सहलीचा खाऊ देण्याऐवजी भेटवस्तू म्हणून ज्योत्स्ना प्रकाशनची गोष्टीची पुस्तके देण्यात आली. 'चित्तरंजन वाटिका' येथे गेलेल्या विद्यार्थ्यांना खाऊ देण्यात आला. तर काही विद्यार्थ्यांना 'शांतीवन' येथे एक दिवसीय सहलीस नेण्यात आले होते. सर्व विद्यार्थ्यांनी सहलीचा आनंद घेतला.
- दि. ०३.०२.२०२४ रोजी 'पुणे परिसर' या विषयावर तिन्ही शाळांचे एकत्रित प्रदर्शन भरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी चार्ट, प्रोजेक्ट करून आणले होते. विविध खेळ ठेवण्यात आले होते तर काही पालक व बाहेरील व्यक्तींना विक्री साठी स्टॉल देण्यात आले होते. प्रदर्शन छान झाले असा अभिप्राय खूप पालकांनी दिला. याची बातमी वृत्तपत्रामध्ये सुध्दा आली आहे.
- दि. २३.०२.२०२४ रोजी अनुग्रह फौंडेशन आयोजित दिव्यांग जनजागृती फेरी संभाजी उद्यान येथे शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते.
- वार्षिक ॲक्टिव्हिटी म्हणून विद्यार्थ्यांकडून त्यांनी स्वत: आणलेल्या कप वर पेन्टिंग करून घेतले.
- विद्यार्थ्यांचे सेफ्टी ड्रील घेण्यात येऊन त्याचे कारण महत्व समजावून सांगण्यात आले.

सांस्कृतिक कार्यक्रम

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| १६.०६.२०२३ | पर्यावरण दिन | - | झाडांची नावे, माहिती, चित्र काढणे व झाडे लावणे इ. उपक्रम शिक्षकांनी वर्गात करून घेतले. |
| २१.०६.२०२३ | योगा दिवस | - | विद्यार्थ्यांच्या क्षमतेप्रमाणे योगासने करून घेण्यात आली. शिक्षकांनी योगासनाचे प्रात्यक्षिक सादर केले. |
| २८.०६.२०२३ | पालखी | - | विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी नृत्य सादर केले. |
| ०३.०७.२०२३ | गुरूपौर्णिमा | सौ. सरला जाधव | वक्तृत्व स्पर्धा |
| ०२.०८.२०२३ | लोकमान्य टिळक पुण्यतिथी | मा. शोभा माळी | पाढे पाठांतर स्पर्धा |
| २९.०८.२०२३ | रक्षाबंधन | प्रिझम फौंडेशनचा ॲडमिन स्टाफ | चित्रकला व टाकाऊ वस्तू पासून वस्तू बनविणे स्पर्धा |
| ०४.०९.२०२३ | कै. पद्मजा गोडबोले आंतरवर्गीय कविता पाठांतर स्पर्धा | विद्या भागवत | कविता पाठांतर स्पर्धा |
| ०७.०९.२०२३ | दही हंडी | - | विद्यार्थ्यांनी दही हंडीचे चित्र रंगून दहीकाल्याचा प्रसाद बनविला. |
| १३.०९.२०२३ ते १५.०९.२०२३ | गणेशोत्सव | - | विद्यार्थ्यांच्या जीवन व्यवहार कृती स्पर्धा घेतल्या गेल्या |
| २०.१०.२०२३ | शारदोत्सव | - | भोंडला करून शिक्षकांतर्फे विद्यार्थ्यांना खिरापत देण्यात आली. |
| ०३.११.२०२३ | दिवाळी पार्टी | - | विद्यार्थ्यांनी किल्ला बनविला, फटाक्यांची आतिषबाजी उडवून दिवाळी साजरी केली. |

| दिनांक | कार्यक्रम | पाहुणे / परीक्षक | स्पर्धा / कार्यक्रम |
|---|---|---|---|
| ०१.१२.२०२३ | क्रीडा स्पर्धा | मा. प्रसाद कानडे | विविध स्पर्धांचे आयोजन |
| १६.१२.२०२३ | स्नेहसंमेलन<br>विषय -<br>'मी, आपण, आम्ही' | सौ. स्नेहलता देशमुख | विद्यार्थ्यांनी विषयानुरूप नृत्य, नाटक सादर केले. |
| २६.०१.२०२४ | प्रजासत्ताक दिन<br>तमोहर प्रकाशन | मा.श्री रविंद्र वंजारवाडकर | विद्यार्थ्यांनी डंबेल्स व व्हिलचेअर वरील विद्यार्थ्यांनी कवायत प्रात्यक्षिके सादर केली. |
| १०.०२.२०२४ | बाजार दिन | - | विद्यार्थ्यांना वस्तू विक्री, खरेदी करणे याची माहिती मिळावी या उद्देशाने |
| २७.०२.२०२४ | मराठी दिन | - | वर्गात शिक्षकांनी शब्द वाचन, चित्र वाचन, जोडीचे शब्द, अशा कृती करून घेतल्या. |
| २८.०२.२०२४ | विज्ञान दिन | - | विद्यार्थ्यांना वर्गात प्रयोग करून दाखविले. तसेच बालकल्याण आयोजित विज्ञान प्रयोग प्रदर्शन पाहण्यास विद्यार्थी गेले होते. |
| २९.०३.२०२४ | रंगपंचमी | - | विद्यार्थ्यांनी एकमेकांना रंग लावून आनंद साजरा केला. |

शैक्षणिक सहल / भेट

| गट | ठिकाण / स्थळ |
|---|---|
| प्राथमिक गट ब व शैक्षणिक गट क | बालकल्याण संस्था |
| शैक्षणिक गट क | हनुमान स्टोअर्स<br>वाहतुक नियम अंतर्गत सिग्नल, नियम, झेब्रा क्रॉसिंग इ. माहिती |
| शैक्षणिक गट अ | बॅडमिंटन व टेबल टेनिस क्रीडा केंद्र |
| पूर्व व्यावसायिक गट | Lead Hand India येथे बागकाम, बेकरी या व्यावसायिक विषयाची माहिती |
| शैक्षणिक गट अ, ब व पूर्व व्यावसायिक गट | पी.वाय.सी जिमखाना येथे खेळाचे मैदान व हॉल मधील खेळ |

वरील शैक्षणिक सहली मधून सामाजिक कौशल्य वाढावे, आजूबाजूच्या परिसराचे ज्ञान व्हावे, अभ्यासक्रमात ज्या गोष्टी आपण शिकतो त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता यावा हा उद्देश साध्य होण्यास मदत झाली.

- Saplings School ला मुख्याध्यापिका व २ शिक्षिकांनी भेट देवून तेथील शैक्षणिक साधनांविषयी माहिती घेतली. गायत्री रांजणगावकर यांनी गणित, भाषा विषयाच्या विविध साधनांची माहिती दिली.

पालक सभा

- दि. २४ जून २०२३ रोजी पहिली पालक सभा घेण्यात आली. यावेळी ३५ पालक उपस्थित होते. संचालिका हर्षा मुळे यांनी संस्थेची माहिती सांगितली. विद्या भागवत यांनी बेन्यू प्रशिक्षण केंद्रातर्फे चालविले जाणारे कोर्स व पालक कार्यशाळेची माहिती दिली. शाळेविषयी पर्यवेक्षिका प्रतिभा मुळे यांनी माहिती दिली.
- ऑक्टोबर मधील सभेत सहामाही मूल्यमापन संदर्भात माहिती देण्यात आली.
- दि. २०.०१.२०२४ रोजी सभेत २६ जानेवारी, प्रदर्शन / प्रोजेक्ट, बाजार दिन, नऊमाही मूल्यमापन बाबत सांगण्यात आले.
- दि. ०४ ते १५.०३.२०२४ याकालवधीत प्रत्येक गटाची स्वतंत्रपणे पालकसभा घेण्यात आली. यामध्ये पुढील नियोजन, बदालेल्या पी.टी युनिफॉर्म बाबत सांगण्यात आले.

स्पर्धा

- लायन्स क्लब ऑफ इंटरनॅशनल आयोजित नृत्य स्पर्धेत, कर्न्सन इंडिया आयोजित चित्रकला स्पर्धा, नवक्षितिज आयोजित आंतरशालेय नाटय स्पर्धेत शाळेने सहभाग घेतला होता. तसेच नवक्षितीज आयोजित पर्वती चढणे स्पर्धेत शाळेतील १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.
- दि. ०६.१०.२०२३ बालकल्याण आयोजित नृत्य, वादन व संगीत राज्यस्तरीय नृत्य स्पर्धेत श्रध्दा कामेरीकर हिला उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले.
- दि. २०.१२.२०२३ रोजी जीवन ज्योत आयोजित नृत्य स्पर्धेत शाळेने सहभाग घेवून उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. तसेच मैदानी स्पर्धेत ही सहभाग घेतला होता.
- उमेद परिवारा तर्फे घेण्यात येणा-या भेटकार्ड / भित्तीचित्र स्पर्धेसाठी १ विद्यार्थीनीला पहिले बक्षिस मिळाले.

बाहेरील कार्यशाळा

- नवक्षितीज आयोजित 'नाटक कसे बसवावे' या कार्यशाळा, KEM आयोजित 'मुलांच्या वर्तवणुक समस्या' या विषयावरील कार्यशाळा, बालकल्याण व निकलास फौंडेशन नागपुर आयोजित 'शैक्षणिक साधनांचे प्रदर्शन व शिक्षकांसाठी प्रशिक्षण' कार्यशाळा यामध्ये शाळेतील शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

कार्यशाळा / कोर्स

- बेन्यू तर्फे शिक्षकांसाठी वर्षभर घेण्यात आलेल्या गप्पांगण कार्यशाळेत शाळेतील शिक्षकांनी स्वत: निवडलेल्या विविध विषयावर आपले मत व्यक्त केले / कार्यशाळा घेतली.
- बेन्यू तर्फे घेतल्या गेलेल्या शॉर्ट कोर्स मध्ये स्वाती सगम यांनी 'मतिमंदत्व', सायली भावे यांनी'ॲटिझम' तर प्रतिभा मुळे यांनी 'शैक्षणिक साधने' याविषयावर व्याख्यान घेतले.

विद्यार्थी शाळा सोडण्याबाबत

- या वर्षी १८ वर्ष पुर्ण झाल्या मुळे शाळेच्या ३ विद्यार्थ्यांनी माधवी ओगले व्यावसायीक शाळेत प्रवेश घेतला आहे.

इतर

- यावर्षी ही बालकल्याण संस्थेत महिन्याच्या १, ३ व ५ व्या मंगळवारी विद्यार्थी ॲटिव्हिटी साठी जात होती.
- नंदिनी भुवड यांनी दिग्दर्शित केलेली शॉर्ट फिल्म 'दिड मिडीचे तेल' याचा प्रकाश सोहळा दि. २७.१०.२०२३ रोजी लार्क एम.ओ.व्ही.एस च्या विद्यार्थ्यांच्या हस्ते प्रिझम प्रांगणात झाला होता. विद्यार्थ्यांच्या हस्ते सिनेमातील कलाकारांना शाळेत बनविलेल्या वस्तू भेट म्हणून देण्यात आल्या. प्रकाश सोहळयासाठी विद्यार्थ्यांकडून एक नृत्य बसवून घेतले होते. हे नृत्य सोशल मिडिया वर दाखविणार असल्यामुळे पालकांकडून तसे संमतीपत्र शाळेने घेतले होते. विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांनाही एक छोटीसी भेटवस्तू दिली.
- सिम्बोयसिस कॉलेज मधील इंटर्नशिपला येणा-या विद्यार्थीनीनी सर्व विद्यार्थ्यांना बॉल भेट म्हणून दिला.

स्वाती सगम<br>
मुख्याध्यापिका<br>
लार्क